# Innovative Activities:

**"युनिक वॉटर कंडिशनरमुळे गावाला मिळाली नवसंजीवनी "**

अक्कलकोट तालुक्यातील मौजे चिंचोळी नं.१४८६ लोकसंख्या असलेले हे गाव अनेक वर्षापासून पिण्याच्या पाण्याची योजना असूनही शुध्द व आरोग्यास उपयुक्त पुरेसे पाणी गावाला मिळत नव्हते. या गावातील सर्वात मोठी समस्या म्हणजे पाण्यात असलेले क्षारांचे प्रमाण अधिक होते. दहा वर्षापुर्वीपासून गावात विहिरीच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना कार्यान्वयीत आहे पण क्षारांचे प्रमाण जास्त असलेने ग्रामस्थांना या पाण्यामुळे विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. या योजनेव्दारे उपलब्ध क्षारयुक्त पाणी पिल्यामुळे पोट जड पडणे, शौचास त्रास होणे, असे शारीरीक आजार गावक-यांना जाणवायला लागले त्यामुळे हळू हळू गावक-यांनी हे पाणी पिण्याचे बंद केले. भोजन बनविण्यासाठी हे पाणी वापरण्यात आलेने अन्न चांगल्याप्रकारे न शिजणे, चहा बनवताना पाणी वापरलेस चहा फुटणे असे अनुभव सर्रास सर्वांना येत होते. कपडे धुण्यासाठीही हे पाणी उपयुक्त नव्हते. या कारणांमुळे ही योजना बंद पडली. ही योजना बंद असलेने नादुरूस्त होणे, खराब होणे, अशास्थितीत ही योजना बंद होती. ग्रामस्थ अन्य माध्यमातुन हातपंप इ. मधुन पिण्याचे पाणी वापरत होते.



- **सन डिसेंबर २००५ मध्ये या गावाचा जलस्वराज्य योजनेत सहभाग :** २००५ मध्ये गावाने जलस्वराज्य योजनेत सहभाग घेतल्यानंतर गावातील पाण्याच्या या प्रश्नाचा अभ्यास करून यावर मात करण्यासाठी विविध प्रयत्न करण्यात आले. ज्या जुन्या विहिरीतून गावाला पाणी पुरवठा होत होता त्या विहिरीचे खोलीकरण करुन खोली २० फुट वाढवण्यात आली. विहिरीला चांगल्या पाण्याचा पाझर होण्यासाठी विहिरीजवळ सिमेंट बंधारा बांधण्यात आला यामुळे पाण्यातील क्षार कमी होण्यास उपयोग झाला. उर्ध्व नलिका,वितरण नलिका,उंच टाकी या उपांगांची नव्याने दुरूस्ती करण्यात आली. विहिरीतील पाण्याचे क्षार कमी होण्यास उपयुक्त ठरले परंतू उपलबध्द पाणी पिण्यासाठी योग्य नव्हते त्यामुळे इतर पर्यायांचा विचार करण्यात आला.माहिती घेण्यात आली. तेंव्हा क्षार कमी होण्यासाठी व पाण्याचे जडत्व कमी करण्यासाठी उपयुक्त असे सयंत्र उपलब्ध झाले.

- **युनिक वाटर कंडिशनर मुळे प्रयत्नांना आले यशः** चुंबकीय पध्दतीवर बनविण्यात आलेले सयंत्र युनिक वाटर कंडिशनर प्रदुषणमुक्त असुन यामध्ये पाण्यातील क्षार व निरूपयोगी व उपयोगी खनिजद्रव्ये यांचे पुर्णपणे विघटन होते. विहिरीपासुन उंच टाकीकडे जाणा-या उर्ध्व नलिकेला बसवले नलिकेच्या व्यासाइतक्या तांब्याच्या पाईपमध्ये हे सयंत्र बसवण्यात आले. पाण्याचा दाब सुरूझाला की हे सयंत्र कार्यान्वयीत होते व आपली प्रक्रीया करण्यास सुरवात करते. हे सयंत्र स्वतंत्रपणे बंद चालु करण्याची आवश्यकता नाही हे विशेष.
- **यशस्वी चाचणी :** गावातील मुख्य उर्ध्व नलिकेला हे संयंत्र बसवून चाचणी घेण्यात आली व ते योग्य प्रकारे कार्यान्वयीत झाले. यामुळे पाण्यात झालेल्या बदलासाठी प्रयोगशाळेत पाणी चाचणी घेण्यात आली. पाण्यातील क्षार कमी झाल्याचा व पाणी पिण्यायोग्य असलेचा अहवाल प्रयोग शाळेने दिला. प्रयत्नांना यश आलेचे समाधान सर्वांना झाले.

  मार्च २००८ मध्ये हे सयंत्र बसवण्यात आले. पण लोकांचा विश्वास बसेना म्हणुन त्यांना या पाण्याचा चहा करणेस,अन्न शिजवण्यास सांगितले, व ते व्यवस्थित होत आहे. याचा विश्वास ग्रामस्थांना आला.व गावात हळूहळू सर्व जण हे पाणी वापरण्यास सुरवात झाली. मार्च पासून आजपर्यंत हे सयंत्र यशस्वीपणे कार्यरत असून गावात या योजनेव्दारे पिण्याचे पाणी मिळत आहे. त्यांना याआगोदर होणारे कोणतेही त्रास आज होत नाहीत.

युनिक वॉटर कंडिशनर हे रु.६९६००/-चे सयंत्र असून यामुळे लाखो रुपये खर्चुन बंद असलेली योजना व नव्याने लाखो रुपये खर्च करुन सुरूकरण्यात आलेली हि योजना या सयंत्रामुळे यशस्वी झाली असून गावाला यामुळे नवसंजीवनीच मिळाली आहे.